भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क. ५६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०८/२०१७

**१) इलेक्ट्रीक मोटार चोरी . :–**

दिनांक ०९/०८/२०१७ चे १३.३० वा. ते दि. १०/०८/२०१७ चे ०६.०० वा. दर. यातील फिर्यादी निलकंठ वय ७५ वर्ष रा. लाखनी यांचे शेताजवळील नाल्याचे किणाऱ्यावर ठेवलेली एक इलेक्ट्रीक किर्लोस्कर कंपनीची ०२ हार्स पावरची मोटार कि. ५,०००/रु ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलगी घरून निघुन गेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०८/२०१७ चे ०८.०० वा. ते १८.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिला कोणीतरी अज्ञात आरोपी इसमाने फुस लावुन पळवुन नेले असावे, किंवा, ती रागाचे भरात घरी कुणालाही न सागंता निघुन गेली असावी अशा फिर्यादीचे तोंडी. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. रेवतकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान तरूणाचा मृत्यु . :–**

दिनांक ११/०८/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील मृतक मनिष गोपाल वंजारी वय २६ वर्ष रा. नेहरू नगर तुमसर हा दारू पाणी पिण्याच्या सवईचा असुन नेहमी पानठेला चालवत नसल्याने लोकांकडुन उधारीचे पैसे घेत असल्याने फिर्यादीने त्याला काल हटकले होते त्या रागावरून यातील मृतकने आज रोजी फिनाईल पिल्याने त्यास औषधोपचारा करीता सु.बो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता, उपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी चंदन गोपाल वंजारी वय ३० वर्ष रा. नेहरू वार्ड तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी. उईके पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) विदयुत करंट लागुन औषधोपचरा दरम्यान युवकाचा मृत्यु. :–**

दिनांक १०/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील मृतक हिवराज मार्कड डोये वय २६ वर्ष रा. खोलमारा याचा चुलत भाऊ श्रीकृष्ण डोये रा. खोलमारा याचे घरून लाईन आणतो म्हणुन त्याचे घरचे मिटर वरून लाईन आनत असतांना मिटरवर वायर टाकीत असता शॉक लागुन खाली पडला त्यास औषधोपचारा करीता पि.एससी बारव्हा येथे नेवुन पुढील उपचारा करीता ग्रा. रू. लाखांदुर येथे भरती केले असता उपचरा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमोवरून पो.स्टे लाखांदुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ.चे कागदपत्र पो.शि. भिवगडे पो.स्टे. दिघोरी चे हस्ते पो.स्टेला प्राप्त झाल्याने पो.स्टे दिघोरी येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा.गभने पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) अवैध दारु अडयावर धाडी :–**

दिनांक ११/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, कारधा, वरठी, सिहोरा व पवनी दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५३ लिटर हा.भ. दारू किंमती ४,४००/–रु. व ०७ लिटर २० मिलीलीटर देशी दारू कि. १,९५०/रु असा एकुण कि.६,३५०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ११/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ८८ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक ०१ तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७१ केसेस करण्यात आलेल्या आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष अधिकारी
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२३११५१८२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.